| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Indian Music) (सत्र – I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षाः मार्च/एप्रिल – २०२५**
**Shatriy Sangeetache Kriyatmak Siddhant (230122103 )**

वार, दिनांक : गुरूवार, १५-०५-२०२५ कमाल गुण : ६०
वेळ: दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) राग अभोगी कानड़ा चा थाट ––– मानला जातो.
अ) कल्याण ब) बिलावल
क) तोड़ी ड) काफी

२) राग गुर्जरी तोड़ीचा वादी स्वर ––– व संवादी स्वर ––– मानला जातो.
अ) धैवत–गांधार ब) धैवत–रेषभ
क) षड्ज–पंचम ड) पंचम–षड्ज

३) राग चंद्रकंस ची जाती ––– मानली जाते.
अ) ओड़व ओड़व ब) षाड़व– संपूर्ण
क) षाड़व–षाड़व ड) संपूर्ण–षाड़व

४) राग भैरवचा गानसमय ––– मानला जातो.
अ) दिवसाचा दुसरा प्रहर ब) दिवसाचा प्रथम प्रहर
क) रात्रीचा पहिला ड) यापैकी नाही

५) राग यमन चा थाट ––– मानला जातो.
अ) बिलावल ब) कल्याण
क) तोड़ी ड) खमाज

६) राग नट भैरव चा वादी स्वर ––– व संवादी स्वर ––– मानतात.
अ) प–सा ब) म–सा
क) ग–नि ड) ध–ग

७) राग श्याम कल्याणची जाती ––– मानली जाते.
अ) ओड़व ओड़व ब) संपूर्ण –संपूर्ण
क) षाडव–संपूर्ण ड) ओडव–संपूर्ण

८) बिलावल थाटाचा जनक राग म्हणून खालीलपैकी ––– रागाला ओळखतात.
अ) देवगिरी बिलावल ब) अल्हैया बिलावल
क) राम बिलावल ड) यमनी बिलावल

९) ताल झपताल –––– मात्रांचा ताल आहे.
अ) ७ ब) १८
क) १३ ड) १०

१०) ताल एकताल ––– मात्रांचा ताल आहे.
अ) १० ब) १२
क) १४ ड) १६

११) सम आणि खाली एकाच मात्रेवर येणारा खालीलपैकी कोणता ताल आहे?
अ) तीनताल ब) एकताल
क) रूपक ड) अध्धा

१२) द्रुत लयीमध्ये गायला जाणारा वादन प्रकार गायन प्रकार म्हणून ––– ओळखला जातो.
अ) ध्रुपद ब) धमार
क) तराणा ड) चतरंग

**प्र.२ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** १२
१) राग केदारच्या समप्रकृतिक रागांची माहिती लिहा.
२) राग पूरिया कल्याण चा छोटाख्याल स्वरलिपीबध्द करा.
३) ताल सूलताल चा शास्त्रीय परिचय देवून ठेक्याची दुप्पट लिहा.
४) ताल रूपक चा शास्त्रीय परिचय देवून ठेका लिहा.
५) राग–अभोगी कानड़ा चा संपूर्ण शास्त्रीय परिचय सांगून आरोह–अवरोह लिहा.
६) राग श्याम कल्याण चा शास्त्रीय परिचय सांगा.

**प्र.३ लघुत्तरी प्रश्न. (कोणतेही दोन)** १२
१) ताल–एकताल चा संपूर्ण शास्त्रीय परिचय सांगून ठेक्याची एकपट, दुप्पट, तिप्पट, चौपट लिहा.
२) 'तराणा' या गायकीतील शब्द 'निरर्थक' असताना हे विधान स्पष्ट करा.
३) राग अल्हैया बिलावलचा छोटाख्याल स्वरलिपीबद्ध करून लिहा.
४) ध्रुपद गायकी बद्दल थोडक्यात माहिती सांगून ते कोणत्या तालात गायले जाते याची माहिती लिहा.

**प्र.४ दीर्घोत्तरी प्रश्न. (कोणताही एक)** १२

१) राग चंद्रकंस किंवा राग केदार चा छोटा़ख्याल स्वरलिपीबद्ध करा. त्यांचा संपूर्ण शास्त्रीय परिचय सांगा.

२) नाट्यगीत या गीतप्रकाराविषयी सविस्तर माहिती उदाहरणासह लिहा.

**प्र.५ दीर्घोत्तरी प्रश्न.** १२

राग भैरव किवा नटभैरव चा बडाख्याल स्वरलिपीबध्द करून त्याचे ४ आलाप व ४ ताना स्वरलिपीबद्ध करा. तसेच त्यांच्या संपूर्ण शास्त्रीय व समप्रकृतिक रागांची नावे लिहा

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Indian Music) (सत्र – I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षाः**
**मार्च / एप्रिल – २०२५**
**Sangeet Ani Prasar Madhyame (230122104)**

वार, दिनांक : शनिवार १७-०५-२०२५ | कमाल गुण : ३०

वेळ: दुपारी ०३:०० ते ०४:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ योग्य पर्याय निवडा.** **०६**

१) लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ––– या माध्यमाला गौरवण्यात आले आहे.
अ) दुरदर्शन ब) वृत्तपत्र
क) रेडिओ ड) इंटरनेट

२) ––– या दृकश्राव्य माध्यमातून श्रोत्यांना संगीत मैफलीचा आनंद घेता येतो.
अ) नियतकालीका ब) दुरदर्शन
क) रेडिओ ड) ग्रामोफोन

३) भारतात रेडिओ प्रसारणासंबंधीचे प्रयोग ––– साली सुरू झाले.
अ) १९२० ब) १९२४
क) १९१५ ड) १९१७

४) पहिले वृत्तपत्र ––– ठिकाणी छापले गेले.
अ) दिल्ली ब) मुंबई
क) कलकत्ता ड) मद्रास

५) मुद्रण कला ही ––– परंपरेतून उगम पावली.
अ) युरोप ब) चीन
क) भारत ड) इजिप्त

६) दुरचित्रवाणीचा शोध ––– मध्ये लागला.
अ) इ. स. १९१५ ब) इ. स. १९३४
क) इ. स. १९२४ ड) इ. स. १९३०

**प्र.२ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन)** **0६**

१) संगीताचा प्रसार होण्यासाठी ध्वनी मुद्रण किती उपयुक्त ठरले ते तुमच्या शब्दात लिहा.

२) संगीताचे प्रसारण करणाऱ्या पहिल्या दृकश्राव्य माध्यमाची माहीती लिहा.

३) संगीत क्षेत्रात प्रसार माध्यमांचा होणारा दुरूपयोगच्या बद्दल तुमचे विचार लिहा.

४) संगीताच्या दृष्टीने यू टयूब चा प्रसार माध्यमाचे कार्य थोडक्यात लिहा.

**प्र.३ टीपा लिहा.** **0६**

'संगीत आणि प्रसार माध्यमे यांचा परस्पर संबंध.

**प्र.4 सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** **१२**

१) संगीताचा प्रचार व प्रसार करण्यासाठी रेडिओ चा प्रसार माध्यमांनी दिलेले योगदान सविस्तर लिहा.

**किंवा**

२) प्रसार माध्यमांचे संगीताच्या दृष्टीने होणारे फायदे तोटे यावर तुमचे मत लिहा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Indian Music) (सत्र – I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षाः मार्च/एप्रिल – २०२५**
**History of Indian music (Form Vedic to XIth Century) (230122106)**

वार, दिनांक : सोमवार, १९-०५-२०२५ कमाल गुण : ६०

वेळ: दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) पुष्कर हे वादय ––– चा काळात प्रचलित होते.
अ) रामायण ब) सामवेद काळ
क) महाभारत ड) पुराण काळ

२) चतुसारणाचे उद्भावक म्हणून ––– यांना ओळखले जाते.
अ) महर्षि भरत ब) मतंग
क) शारंग देव ड) नारद

३) संगीत विज्ञानाच्या संबंधित ––– हा उपवेद केला होता.
अ) सामवेद ब) गंधर्ववेद
क) बृहीवेद ड) शिक्षावेद

४) किन्नरी विणाचे निर्माते ––– यांना म्हणतात.
अ) नारद ब) मतंग
क) आचार्य बृहस्पती ड) शारंग देव

५) संगीत साहित्यामतध्ये ‘राग’ या शब्दाचा प्रयोग ––– यांनी केला.
अ) आचार्य बृहस्पृती ब) शारंगदेव
क) नारद ड) मतंग

६) 33 प्रकारच्या अलंकाराचा उल्लेख ––– च्या ग्रंथात मांडला आहे.
अ) नाट्यशास्त्र ब) राततंरगिणी
क) बृहदेशी ड) भरतनाटयम्

७) बृहदेशी या ग्रंथाचे जनक म्हणून ––– यांना ओळखले जाते.
अ) भरतमुनी ब) शारंगदेव
क) दामोदर पंडित ड) मतंगमुनी

८) सं. रत्नाकर मध्ये ग्राम राग ––– किती मानले आहेत.
अ) १२ ब) १८
क) २३ ड) ३0

९) करूण रसाची उत्पत्ती ––– या स्वरातून होते.
अ) रिषभ ब) निषाद
क) वैवत ड) षड्ज

१0) संगीत विशारद या ग्रंथाचे लेखक ––– आहेत.
अ) वसंत ब) मतंग
क) दामोदर पंडित ड) यापैकी नाही

११) राग–तिलक कामोद खालीलपैकी ––– या प्रकारातील राग आहे.
अ) शुध्दराग ब) छायालग
क) संकीर्ण ड) जोग

१२) शारंगदेव यांनी किती रागाचे वर्णन केलेले आहे.
अ) २६0 ब) २३0
क) २६८ ड) २६४

**प्र.२ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** १२
१) मागी संगीता विषयी थोडक्यात लिहा.
२) सामवेद संगीता विषयी सांगून त्यांची रचना स्पष्ट करा.
३) मार्कंडेय पुराण व वायुपुराण यांवर टिप लिहा.
४) वैदिक काळातील स्वरांचे स्वरूप स्पष्ट करा.
५) मौर्य कालीन संगीत कला स्पष्ट करा.
६) संगीत रत्नाकर या ग्रंथाचे सात अध्ययानुसार वर्णन करा.

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२
१) महाभारत कालीन संगीताचे वर्णन करा.
२) दत्तिम नियमानुसार जातीची दहा लक्षणे लिहा.
३) दत्तिलम् यांच्या मतानुसार मुर्च्छना चा विषयाचे विस्तृत अध्ययन व विवेचन करा.
४) भरत भाष्यम् या प्राचीन ग्रंथामध्ये वर्णन केलेल्या संगीत विषयक अभ्यासाची संक्षिप्त माहिती दया.

**प्र.४ सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** १२

१) ग्रामरूपी दोन सप्तकाबद्दलचा महत्त्वाचा सिध्दांत तसेच वादी संवादीची लक्षणाचा दोहोचे तुलनात्मक विवेचन करा.

२) देशी ताल व मागी ताल तुलनात्मक विवेचन करा.

**प्र.५ सविस्तर उत्तर लिहा.** १२

संगीत रत्नाकर ग्रंथातील अध्याया विषयी सविस्तर लिहा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Indian Music)(सत्र – I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा: मार्च/एप्रिल – २०२५**
**Research Methodology in Music (230122105)**

वार, दिनांक : शनिवार, २४-०५-२०२५ कमाल गुण: ६०
वेळ: दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ योग्य पर्याय निवडा.** १२

**१)** अनुसंधान म्हणजे ––– होय.
अ) कार्याभ्यास ब) सर्वेक्षण
क) प्रयोग पद्धती ड) व्यक्ती अध्ययन

**२)** संशोधन कार्य ही एक ––– चालणारी प्रक्रिया आहे.
अ) संवादात्मक ब) बोधात्मक
क) निरंतर ड) यापैकी नाही

**३)** कोणतेही शास्त्र हे ––– स्वरूपाचे असते.
अ) सैद्धांतिक ब) उपयुक्त
क) अ व ब दोन्ही ड) यापैकी नाही

**४)** शोध प्रबंधाचे विधान ––– असते.
अ) एक निरिक्षण ब) एक तथ्य
क) एक दृढकथन ड) एक विचार विमर्श

**५)** गृहीत कृत्यालाचा ––– असे म्हणतात.
अ) उपकल्पना ब) सिद्धांत कल्पना
क) अभ्युपगमन ड) वरील सर्व

**६)** संशोधकासाठी सर्वात आवश्यक गुण ––– हा होय.
अ) वक्तशीरपणा
ब) बुद्धीमत्ता
क) संशोधनातील मनापासून असणारी अभिरूची
ड) स्वतःच्या विषयावरील प्रभुत्व

**७)** संगीत ही ––– कला आहे.
अ) ऐतिहासिक ब) प्रयोगशील
क) सांस्कृतिक ड) यापैकी नाही

८) परिक्षण केल्या जाणाऱ्या प्रस्तावांना ––– असे म्हणतात.
अ) कल्पना ब) परिकल्पना
क) उपकल्पना ड) संकल्पना

९) 'क्रमिक पुस्तक मालिका' या पुस्तकाचे लेखक ––– आहेत.
अ) पं. वामनराव देशपांडे ब) पं. भातखंडे
क) पं. पलुस्कर ड) पं. रातंजनकर

१०) संशोधनाची सुरूवात ––– पासून होते.
अ) समस्या ब) कारणमिमांसा
क) विषय निश्चिती ड) परिकल्पना

११) ––– म्हणजे विखुरलेल्या सुत्रांना एकत्रित बांधणे.
अ) मुल्यांकन ब) माहिती संकलन
क) निष्कर्ष ड) अनुसंधान

१२) 'आवाज साधना शास्त्र' चे संशोधक ––– आहेत.
अ) डॉ. बी. आर. देवधर ब) राजेंद्र मणेरिकर
क) अशोक रानडे ड) यशवंत देव

**प्र.२ टिपा लिहा. (कोणतेही चार)** **१२**
१) संशोधक
२) संशोधनातील अहवाल लेखन
३) विश्वविद्यालयीन स्तरावरील संगीतातील शोध व समस्या
४) माहिती संकलनातील दुय्यम स्त्रोत
५) संशोधनात संगणकाचा वापर
६) डॉ. अशोक रानडे – सांगितीक योगदान

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **१२**
१) शोध प्रक्रिया म्हणजे काय ते सांगून शोध प्रक्रियेमध्ये येणारे टप्पे याबद्दल थोडक्यात लिहा.
२) संशोधनाचे उद्देश थोडक्यात स्पष्ट करा.
३) संदर्भसूचीचे विश्लेषण करून संदर्भसूचीमध्ये ग्रंथसूचीचे महत्त्व स्पष्ट करा.
४) संशोधकाची कर्तव्ये थोडक्यात लिहा.

**प्र.४ सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १२

१) संशोधनामध्ये विषयाची निवड कशी केली जाते ते लिहा.

**किंवा**

२) संशोधनामध्ये मार्गदर्शकाचे महत्त्व आणि भूमिका विशद करा.

**प्र.५ सविस्तर उत्तर लिहा.** १२

संगीतातील संशोधनाच्या विविध क्षेत्रांची माहिती सविस्तर लिहा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम्.ए. (Indian Music) (सत्र – II) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा: मार्च/एप्रिल - २०२५**
**Shatriy Sangeetache Kriyatmak Siddhant (230122203)**

वार, दिनांक : बुधवार, १४-०५-२०२५ कमाल गुण: ६०
वेळ: सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) राग – शुद्ध सारंग चा थाट ––– मानला जातो.
अ) कल्याण ब) बिलावल
क) आसावरी ड) खमाज

२) राग – केदार चा वादी स्वर ––– व संवादी स्वर ––– मानला जातो.
अ) सा प ब) प सा
क) म सा ड) प रे

३) राग – मियाँ की तोड़ी चा गानसमय ––– आहे.
अ) दिवसाचा प्रथम प्रहर ब) दिवसाचा तृतीय प्रहर
क) दिवसाचा दुसरा प्रहर ड) रात्रीचा दुसरा प्रहर

४) राग – मारूबिहाग ची जाती ––– मानली जाते.
अ) षाडव–षाडव ब) षाड़व–संपूर्ण
क) औडव संपूर्ण ड) आडेव–आडेव

५) राग–बिलासखानी तोड़ी ––– थाटातून निर्माण होतो.
अ) भैरव ब) भैरवी
क) कल्याण ड) बिलावल

६) राग–गुर्जरी तोड़ीचा वादी स्वर ––– व संवादी स्वर ––– मानला जातो.
अ) रे प ब) म सा
क) प रे ड) ध रे

७) राग–गावती चा थाट ––– मानला जातो.
अ) काफी ब) बिलावल
क) भैरव ड) कल्याण

८) राग–मधुवंती मधील रेषभ आणि धैवत कोमल केल्यास ––– रागांची निर्मिती होते.
   अ) तोड़ी    ब) पूर्वी
   क) मुलतानी    ड) खमाज

९) धमार गायकींसाठी ––– तालाचा वापर जास्त प्रमाणात होतो.
   अ) तीनताल    ब) चौताल
   क) धमार    ड) एकताल

१०) तराणा गायकींतील शब्द ––– प्रकारचे असतात.
   अ) अर्थपूर्ण    ब) भावनिक
   क) निरर्थक    ड) यापैकी नाही

११) ताल–दिपचंदीच्या एकूण मात्रा ––– आहेत.
   अ) १४    ब) १३
   क) १२    ड) ११

१२) ताल–झूमरा च्या एकूण मात्रा ––– आहेत.
   अ) ८    ब) १०
   क) १२    ड) १४

**प्र.२ टीपा लिहा. (कोणतेही चार)** १२

१) राग–मारूबिहाग चा शास्त्रीय परिचय लिहा.
२) राग–झिंझोंटी चा छोटा ख्याल स्वरलिपीबद्ध करा.
३) ताल–झपताल चा शास्त्रीय परिचय देऊन ठेका लिहा.
४) धमार गीतप्रकारावर थोडक्यात टिपणी तयार करा.
५) तराणा गायनशैली बद्दल थोडक्यात सांगा.
६) राग–किरवानी चा शास्त्रीय परिचय सांगा.

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

१) राग–मधुवंती किंवा राग गावतीचा छोटा ख्याल स्वरलिपीबद्ध करा.
२) राग–मियाँ की तोड़ी आणि राग–गुर्जरी तोड़ी मधील फरक स्पष्ट करा.
३) धमार गायकीबद्दल सविस्तर चर्चा करा.
४) ताल–दिपंचंदी चा संपूर्ण शास्त्रीय परिचय देऊन ठेका लिहा.

**प्र.४ सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १२

१) तराणा या गीतप्रकाराविषयी सविस्तर माहिती लिहा आणि तराणा या गीतप्रकारातील शब्द निरर्थक असतात. हे विधान स्पष्ट करा.

२) ताल–धमार, ताल रूपक, ताल झूमरा आणि ताल–दिपचंदी या चारही तालांचा शास्त्रीय परिचय देऊन ठेकासह, दुप्पट, तिप्पट आणि चौपट लिहा.

**प्र.५ सविस्तर उत्तर लिहा.** १२

राग–मियाँ की तोड़ी किंवा राग–बिलासखानी तोड़ी चा संपूर्ण शास्त्रीय परिचय लिहून बड़ाख्याल स्वरलिपीबद्ध करून चार आलाप व चार ताना लिहा व त्याचबरोबर मियाँ की तोड़ी आणि गुर्जरी तोड़ी यामधील फरक सांगा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Indian Music) (सत्र – II) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**मार्च / एप्रिल – २०२५**
**Criticism in Music (230122204)**

वार, दिनांक : शुक्रवार, १६-०५-२०२५ कमाल गुण: ३०
वेळ: सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ रिकाम्या जागा भरा.** **०६**

१) वृत्तपत्रीय समीक्षेचे जनक म्हणून ––– यांना ओळखतात.
अ) एडिसन ब) ड्रायडेन
क) कै. गोविंदराव टेंबे ड) केशवराव कोळे

२) ––– या संगीत समीक्षेमध्ये गायकांचे व मैफिलींचे सर्व सत्य गुणदोष सांगितले जातात.
अ) वास्तविक ब) शास्त्राधिष्ठित
क) मानसशास्त्रीय ड) तुलनात्मक

३) संगीत समीक्षा ही अशी कसोटी आहे की जिच्या साहाय्याने कोणत्याही रचनेचे मूल्यांकन केले जाते हे मत ––– यांनी मांडले आहे.
अ) एडिसन ब) ड्रायडेन
क) बायेन्तर ड) बोईसाल

४) संगीत समीक्षा म्हणजे ––– होय.
अ) टिका करणे ब) चिकित्सा करणे
क) सर्वंकषरित्या पाहणे ड) दोष काढणे

५) संगीत समीक्षेची आवश्यकता सांगताना 'रागरहस्य' मध्ये 'शत्रूचे ही गुण गावेत आणि गुरूचे ही दोष दाखवावेत' असे उद्‌गार ––– यांनी काढले आहेत.
अ) आचार्य कैलाशचंद्र बृहस्पती ब) कै. गोविंदराव टेंबे
क) केशवराव कोळे ड) यापैकी नाही

६) लिहण्या वाचण्याची साधने नव्हती तेव्हा ––– पद्धतीने संगीत समीक्षा केली जात.
अ) कल्पनात्मक ब) मौखिक
क) विचारात्मक ड) यापैकी नाही

**प्र.२ थोडक्यात उत्तरे लिहा.** **०६**

१) ब्रायेन्तर यांची संगीत समीक्षेची व्याख्या सांगा.
२) संगीत समीक्षेची उत्पत्ती थोडक्यात सांगा.
३) संगीत समीक्षा म्हणजे काय? तुमच्या शब्दांत लिहा.
४) संगीत समीक्षेचे स्वरूप थोडक्यात सांगा.

**प्र.३ सविस्तर उत्तरे लिहा.** **०६**

संगीत समीक्षेची ऐतिहासिक पार्श्वभूमी लिहा.

**प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा** **१२**

१) वृत्तपत्रीय संगीत समीक्षा बद्दल सविस्तर माहिती लिहा.
२) संगीत समीक्षकांमध्ये कोणकोणते असायला पाहिजेत स्पष्ट करून सांगा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Indian Music) (सत्र – II) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**मार्च/एप्रिल – २०२५**
**History of Indian music (Form XII$^{th}$ to XVII$^{th}$ Century (230122206)**

वार, दिनांक : मंगळवार, २०-०५-२०२५ कमाल गुण : ६०
वेळ: सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** **१२**

१) प्राचीन काळातील विद्वानांच्या नुसार श्रुती वर आधारित स्वरांचा क्रम ––––– असा आहे.
अ) गांधार, माध्यम, पंचम, निषाद
ब) निषाद, गांधार, पंचम, मध्यम
क) माध्यम, पंचम, निषाद, गांधार
ड) गांधार, पंचम, निषाद, मध्यम

२) ––– काळात श्रुती च्या स्थापनेचा उल्लेख सापडतो.
अ) प्राचीन ब) मध्य
क) आधुनिक ड) वरील सर्व

३) नादाच्या सूक्ष्म भागाला –––– असे म्हणतात.
अ) अनुनाद ब) स्वर
क) श्रुती ड) गोंगाट

४) अनिबध्दचा अर्थ ––– होय.
अ) तालबध्द ब) तालयुक्त
क) बंधयुक्त ड) तालमुक्त

५) स्वरांचे ––– भेद होतात.
अ) २ ब) ३
क) ४ ड) ६

६) श्रुती च्या ––– जाती मध्ये शृंगार आणि हास्य रस उत्पन्न होतो.
अ) दिप्ता ब) आयता
क) मृदु ड) करूणा

**७)** विकृत स्वरांचे ———— प्रकार आहेत.

| | |
|---|---|
| अ) १ | ब) २ |
| क) ३ | ड) ४ |

**८)** ध्रुपद गायनाचा आविष्कार सर्व प्रथम ——— शतकात झाला.

| | |
|---|---|
| अ) १२ | ब) १५ |
| क) १४ | ड) १६ |

**९)** पेहरा गीती मधून ——— या गायकी ती उत्तपत्ती झाली.

| | |
|---|---|
| अ) ध्रुपद | ब) टप्पा |
| क) त्रितंत्री वीणा | ड) ठुमरी |

**१०)** संगीत समयसार या ग्रंथाचा पाचवा अध्याय ——— आहे.

| | |
|---|---|
| अ) रागाध्याय | ब) प्रबंधाध्याय |
| क) वाद्याध्याय | ड) तालाध्याय |

**११)** सात शुध्द आणि पंधरा विकृत स्वरांचे वर्णन ———— ग्रंथात आहे.

| | |
|---|---|
| अ) संगीत दर्पण | ब) नाट्यशास्त्र |
| क) संगीत शास्त्र | ड) राग विबोध |

**१२)** अष्ट छाप कवी मध्ये ———— प्रमुख कवी हेते.

| | |
|---|---|
| अ) नंददास | ब) कृष्णादास |
| क) सूरदास | ड) गोंविददास |

**प्र.२ टीपा लिहा. (कोणत्याही चार)** **१२**

१) आधुनिक काळातील श्रुती स्वर विभाजन
२) ध्रुपद
३) संगीत समयसार– ग्रंथ परिचय
४) प्राचीन प्रबंध गायन
५) किन्नरी वीणा
६) अष्टछाप कवी वल्लभाचार्य

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन)** **१२**

१) पं. शारांगदेव नुसार स्वर श्रुती विभाजन स्पष्ट करा.
२) जाती गायनांची दहा लक्षणे थोडक्यात विवेचन करा.
३) एक तंत्री वीणा व आलापिणी वीणा या वाद्याची थोडक्यात माहिती लिहा.
४) संगीत दर्पण या ग्रंथाची माहिती तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र.४ खालील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा (कोणताही एक)** १२

१) अनिबध्द गायन म्हणजे काय ते सांगून या गायन प्रकारची सविस्तर माहिती लिहा.

२) अष्टाछाप कवींचा परिचय विस्तारीत रूपात लिहा.

**प्र.५ निबंधात्मक उत्तर.** १२

संगीत रत्नाकर या ग्रंथातील सप्ताध्यायाचे सविस्तर विवेचन करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Indian Music) (सत्र – III) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**मार्च/एप्रिल – २०२५**
**Shatriy Sangeetache Kriyatmak Siddhant (230122303)**

वार, दिनांक : गुरूवार, १५-०५-२०२५ कमाल गुण: ६०
वेळ: सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) राग–मेघ मल्हार चा वादी स्वर ––– व संवादी स्वर ––– मानला जातो.
अ) सा–प ब) ग–नि
क) म–सा ड) ध–ग

२) खालीलपैकी राग देवगिरी बिलावल थाट ––– आहे.
अ) कल्याण ब) तोडी
क) बिलावल ड) खमाज

३) राग चंद्रकौस ––– थाटातील राग आहे.
अ) तोडी ब) भैरव
क) भैरवी ड) यापैकी नाही

४) राग–मधुवंतीचा समप्रकृतिक राग ––– आहे.
अ) नटभैरव ब) अहिरभैरव
क) मुलतानी ड) मारूबिहाग

५) राग–अल्हैया बिलावलचा वादी स्वर ––– व संवादी स्वर ––– आहे.
अ) ध–ग ब) सा–प
क) म–सा ड) यापैकी नाही

६) खालीलपैकी राग जोग चा समप्रकृतिक राग ––– आहे.
अ) खमाज ब) तिलंग
क) भैरव ड) तोडी

७) राग मुलतानी मधील कोमल रेषभ आणि कोमल धैवत शुद्ध केल्यास ––– रांगाचे स्वर आढळतात.

अ) राग–गावती  ब) राग–पटमंजिरी
क) राग–मधुवंती  ड) राग–गौरी

८) राग–देसकार ची जाती ––– आहे.

अ) संपूर्ण – संपूर्ण  ब) ओडव – संपूर्ण
क) ओडव – ओडव  ड) षाडव – संपूर्ण

९) राग–सूर मल्हार चा वादी स्वर ––– व संवादी स्वर ––– मानला जातो.

अ) सा–म  ब) प–सा
क) ग–नि  ड) यापैकी नाही

१०) ताल–अडा चौताल च्या एकूण ––– मात्रा आहेत.

अ) १५  ब) १३
क) १२  ड) १४

११) तराणा गीतप्रकारातील शब्द ––– प्रकारचे असतात.

अ) अर्थपूर्ण  ब) सौंदर्यपूर्ण
क) निरर्थक  ड) यापैकी सर्व

१२) ताल पंचमसवारीच्या एकूण मात्रा ––– आहेत.

अ) १५  ब) १८
क) १३  ड) १२

**प्र.२ टिपा लिहा. (कोणत्याही चार)** १२

१) राग मियाँ मल्हारचा शास्त्रीय परिचय थोडक्यात लिहा.
२) ताल आडाचौताल ची शास्त्रीय माहिती व ठेका लिहा.
३) राग देवगिरी बिलावल चा छोटयाख्याल स्वरलिपीबद्ध करा.
४) त्रिवट या गीत प्रकाराविषयी माहिती लिहा.
५) अध्वदर्शक स्वर
६) संधिप्रकाश राग

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

१) राग अल्हैया बिलावल चा बडाख्याल स्वरलिपीबद्ध करा.
२) राग मुलतानी व मधुवंती मधील साम्य व भेद सांगा.
३) पूर्वांग राग म्हणजे काय? व उत्तरांग राग म्हणजे काय? स्पष्ट करा.
४) ताल रूपक चा शास्त्रीय परिचय व ठेक्याची दुप्पट, तिप्पट लिहा.

**प्र.४ दीर्घोत्तरी प्रश्न. (कोणताही एक)** १२

१) राग चंद्रकौंस किंवा राग मधुवंती चा बडाख्याल स्वरलिपीबद्ध करून त्याचे चार आलाप व चार ताना स्वर लिपीबद्ध करा.

२) ताल आडाचौताल व ताल पंचमसवारी दोन्ही तालांची शास्त्रीय माहिती सांगून ठेक्याचे दुप्पट, तिप्पट आणि चौपट लिहा.

**प्र.५ दीर्घोत्तरी प्रश्न.** १२

राग मेघ मल्हार चा शास्त्रीय परिचय देऊन बडाख्याल व छोटाख्याल तसेच पाच आलाप व पाच तानांसह स्वरलिपीबद्ध करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Indian Music) (सत्र – III) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**मार्च / एप्रिल – २०२५**
**Aesthetics of Music (230122304)**

वार, दिनांक : शनिवार, १७-०५-२०२५ कमाल गुण: ३०
वेळ: दुपारी ११:०० ते १२:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** **०६**

१) संगीताचे सौंदर्य शास्त्र म्हणजे संगीतातील सौंदर्य ––– आणि त्याची निर्मिती यांचा अभ्यास.
अ) रस ब) अभिरूची
क) राग ड) रचना

२) संगीत शिक्षणाचे सौंदर्य विषयक तत्वज्ञान ––– या कल्पने भोवती केंद्रित आहे.
अ) संगीत अभिरूची वाढवणे ब) संगीत भावना व्यक्त करणे
क) संगीत रस निष्पत्ति करणे ड) यापैकी नाही

३) सौंदर्याचे दोन आधार ––– आहेत.
अ) स्वर आणि लय ब) स्वर आणि शब्द
क) निसर्ग आणि कला ड) कला आणि अभिरूचि

४) सौंदर्य शास्त्र (Aesthetics) या शब्दांची उत्पति ––– भाषेतून झाली.
अ) ग्रीक ब) इंग्रजी
क) स्पॅनिश ड) मराठी

५) प्रतिभेच्या जोरावर आनंद देण्याच्या दृष्टीने ––– चा आविष्कार केला जातो त्यास ललित कला असे म्हणतात.
अ) रस ब) स्वर
क) सौंदर्य ड) वरील सर्व

६) ––– या प्राचीन ग्रंथामध्ये सौंदर्य शास्त्राचे विस्तरून विवेचन आढळून येते.
अ) नाट्यशास्त्र ब) संगीत रत्नाकर
क) बृहदेशी ड) अभिनय दर्पण

**प्र.२ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **०६**

१) राग – काळजीपूर्वक केलेली बांधणी
२) लयीचा विचार – सौंदर्य शास्त्रे पातळी
३) जयपूर घराण्याच्या गायन शैलीचा सौंदर्य दृष्टिकोण
४) कला निर्मिती मधील सौंदर्य खुलवणारे घटक

**प्र.३ सविस्तर उत्तर लिहा.** **०६**

डॉ. अशोक रानडे यांच्या मतानुसार सांगीतिक सौंदर्याचे निकष किंवा त्यांच्या मूलभूत संकल्पना स्पष्ट करा.

**प्र.४ सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** **१२**

१) कलाकाराच्या दृष्टिकोनातून सौंदर्यशास्त्राचे महत्व स्पष्ट करा.

**किंवा**

२) 'कला निर्मिती व तिचा आस्वाद' अशा दोन्ही प्रक्रिया जिथे पूर्ण होतात ते सौंदर्य होय हे विधान स्पष्ट करून विस्तृतपणे लिहा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Indian Music) (सत्र – III) (नवीन) (NEP CBCS)**
**परीक्षाः मार्च/एप्रिल – २०२५**
**History of Indian Music (16th Centure to till date Modern Period)**
**(230122306)**

वार, दिनांक : सोमवार, १९-०५-२०२५ कमाल गुण: ६०
वेळ: सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) बिस्मिल्लाह खान यांचे गुरू ——— होते.
अ) उ.रसुल खान ब) अली बख्श खान
क) हुसैन बक्श खान ड) अमीर बख्श खान

२) पं. त्यागराज यांचा जन्म ——— मध्ये झाला होता.
अ) ७ मे १७६२ ब) ४ मे १९६७
क) ५ मे १९६८ ड) ६ मे १७६६

३) संगीत तज्ञांच्या विशिष्ट गायन वादन अथवा नृत्य पध्दतीस ——— म्हणतात.
अ) परंपरा ब) घराणे
क) कला अविष्कार ड) वरील सर्व

४) ——— हे पुस्तक पं. रविशंकर यांनी लिहीले आहे.
अ) माय म्युझिक माय लाईफ ब) रागमाला
क) माय म्युझिक ड) यापैकी नाही

५) गोबरहार बाणीचे प्रवर्तक ——— यांना मानले जाते.
अ) ब्रजचन्द्र ब) श्रीचंद्र राजपूत
क) समोखन सिंह ड) तानसेन

६) ख्याल रचना करण्याचे कार्य सर्वप्रथम ——— यांनी मांडले.
अ) अमिर खुस्त्रो ब) न्यामत खाँ
क) अमिर खाँ ड) तानसेन

७) ––– हे ख्याल गायकीचे पहिले मूळ घराणे मानले जात.
अ) ग्वाल्हेर ब) आग्रा
क) किराणा ड) जयपूर

८) मुंबईमध्ये 'गायन समाज' या संस्थेची स्थापना ––– यांनी केली.
अ) पं. विष्णु दिगंबर ब) रामकृष्णबुवा वझे
क) बाळकृष्ण बुआ इंचलकरंजीकर ड) मल्लिकार्जुन मन्सुर

९) ––– यांनी शुध्द विकृत स्वर २९ मानले.
अ) शारंग देव ब) भरतमुनी
क) अहोबल ड) दत्तीलम

१०) मल्लिकार्जुन मन्सुर यांनी ––– या घराण्यातून शिक्षण घेतले.
अ) किरणा घराणे ब) ग्वाल्हेर घराणे
क) जयपूर घराणे ड) आग्रा घराणे

११) स्वामी हरिदास रचित ग्रंथाचे नाव ––– आहे.
अ) नादरस ब) नादविनोद
क) श्रृंगारहार ड) रामरंग लहरी

१२) सदारंग यांचे नाव ––– हे होय.
अ) न्यामत खाँ ब) भूपत खाँ
क) बन्दू खाँ ड) फैय्याज खाँ

**प्र.२ टीपा लिहा. (कोणतेही चार)** **१२**

१) हवेली संगित –
२) मंच प्रदर्शनाची भविष्यकालिन स्थिती –
३) भेंडीबाजार घराणा गायकीचे वैशिष्टये –
४) अमिर खुसरो यांचे सांगितीक योगदान –
५) हिंदूस्थानी संगीतामध्ये धृपद बाणींचे महत्त्व–
६) सदारंग व अदारंग यांच्या बंदिशी–

**प्र.३ थोडक्यात उत्तरे /टीपा लिहा. (कोणतेही दोन)** **१२**

१) मंच प्रदर्शनाच्या दृष्टीने संगिताच्या सादरीकरणामध्ये होत गेलेल्या बदलांची चर्चा करा.
२) किराणा घराण्याची माहिती लिहून त्याची वैशिष्टये लिहा.
३) घराण्याची व्याख्या लिहून घराण्याचे स्वरूप कसे असते ते थोडक्यात लिहा.
४) धृपदाची निर्मित्ती कशी झाली हे सांगून धृपद गायनशैलीचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र.४ सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** १२

१) पं. जितेंद्र अभिषेक यांचे सांगितीक योगदान विस्तृतपणे लिहा.

२) संगीत कलेची आजची स्थिती काय आहे ते सांगून संगित क्षेत्रातील मोठया घराण्याचे भवितव्य तुमचे मत लिहा.

**प्र.५ सविस्तर उत्तर लिहा.** १२

तानसेन यांचे जीवन चारित्र तुमच्या शब्दात लिहा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

## एम.ए. (Indian Music) (सत्र – III) (जुना) (CBCS) परीक्षाः मार्च/एप्रिल – २०२५
## Methodology of Research (MA2220302)

वार, दिनांक : गुरूवार, १५-०५-२०२५ कमाल गुण : ८०

वेळ: सकाळी ११:०० ते ०२:००

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १६

१) ––– द्वारे संशोधन करण्यामागील मुख्य हेतू भूत काळातील घटनांना पूनःप्रकाशात आणणे.
अ) सर्वेक्षण पद्धती ब) ऐतिहासिक पद्धती
क) धारणात्मक पद्धती ड) तुलनात्मक पद्धती

२) वास्तविक माहीती प्राप्त करण्यासाठी केल्या गेलेल्या टिकात्मक निरीक्षणाला ––– पद्धतीचे संशोधन म्हणतात.
अ) सर्वेक्षण ब) ऐतिहासिक
क) तुलनात्मक ड) यापैकी नाही

३) सहेतूक नमुना निवड ––– नमुना निवडीचा एक प्रकार आहे.
अ) संभाव्य ब) गैर संभाव्य
क) पर्याय अ आणि ब ड) यापैकी नाही

४) संशोधनामधील सर्वात महत्वपूर्ण घटना ––– होय.
अ) नमुनानिवड ब) संशोधन आराखडा
क) माहिती संकलन ड) अहवाल लेखन

५) ––– यामुळे संशोधनाला योग्य दिशा मिळते.
अ) संदर्भसाहीत्य आढावा ब) संशोधन आराखडा
क) नमुना निवड ड) पर्याय अ आणि ब

६) परिक्षण केल्या जाणाऱ्या प्रस्तावांना ––– असे म्हणतात.
अ) कल्पना ब) परिकल्पना
क) उपकल्पना ड) संकल्पना

७) ——— हे संगीतज्ञ व चिकिस्तक दोन्ही आहेत.
अ) डॉ. बी. एल् वर्मा ब) विष्णू दिगंबर पलूस्कर
क) डॉ. एल् सुब्रमण्यम ड) संजीव अभ्यंकर

८) 'आवाज जोपासना शास्त्र' चे संशोधन ——— यांनी केले.
अ) राजेंद्र मणेरीकर ब) अशोक रानडे
क) बी. आर. देवधर ड) विष्णू दिगंबर पलूस्कर

९) सर्वेक्षण पद्धतीची ——— साधने आहेत.
अ) ३ ब) २
क) ४ ड) ५

१०) प्रबंधाची विभागणी ——— भागामध्ये केली जाते.
अ) १ ब) २
क) ३ ड) ४

११) ——— यांनी 'रसिकरंगा' या नावानी हिंदूस्थानी शास्त्रीय संगीतात बंदिशी रचल्या आहेत.
अ) श्रुति सडोलीकर ब) उल्हास कथाळकर
क) अशोक रानडे ड) वा. ह. देशपांडे

१२) संशोधनाचे स्वरूप ——— सष्ट होते.
अ) वैज्ञानिक व सांखिकिय पद्धतीने
ब) सखोल अभ्यास
क) गृहीतकाच्या निर्मितीने
ड) पुनरावृत्तीने

१३) संगीत आणि मानसशास्त्राचा ——— संबंध आहे.
अ) केवळ मानसिक विकासात ब) केवळ भावनेचा
क) अ आणि ब दोन्ही ड) यापैकी नाही

१४) शोध प्रक्रियेचा शेवटचा टप्पा ——— हा आहे.
अ) गृहीतक बनविणे ब) विश्लेषण करणे
क) अहवाल बनविणे ड) सारांश लिहीणे

१५) संगीत संशोधकाचे ——— तंत्र स्वतंत्र पद्धत म्हणून वापरले जाते.
अ) केस अध्ययन
ब) गुणात्मक संशोधन तंत्र
क) कला तंत्र आधारित संशोधन तंत्र
ड) मिश्रित तंत्र

१६) संगीत ही ——— कला आहे.
अ) ऐतिहासिक ब) प्रयोगशील
क) सांस्कृतिक ड) यापैकी नाही

**प्र.२ टीपा लिहा. (कोणतेही चार)** १६
१) सर्वेक्षण पद्धती
२) शिक्षण क्षेत्र
३) संशोधनाची आवश्यकता
४) तळटिपा
५) ग्रंथसूची
६) व्याप्ती आणि मर्यादा

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १६
१) उपकल्पना म्हणजे काय? उपकल्पनेचे विश्लेषण करा.
२) संशोधन म्हणजे काय? संशोधनाच्या प्रकारांची माहीती लिहा.
३) अहवाल लिहीताना संशोधन कर्त्याने कोणत्या बाबींचा विचार करावा.
४) पं. वामनराव देशपांडे यांचे संगीत क्षेत्रातील योगदान तुमच्या शब्दात लिहा.

**प्र.४ सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही एक)** १६
१) संशोधनासाठी विषयाची निवड करताना संशोधनाचा दृष्टीकोन कसा असावा याविषयी तुमचे मत स्पष्ट करा.

**किंवा**

२) 'संशोधन करणाऱ्या संशोधकाच्या काही प्राथमिक अर्हता असणे आवश्यक आहे. त्या अर्हतांविषयी सविस्तर लिहा.

**प्र.५ सविस्तर उत्तर लिहा.** १६
आदर्श संशोधकामध्ये कोणते गुण असणे आवश्यक आहे.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Indian Music) (सत्र – III) (जुना) (CBCS) परीक्षाः**
**मार्च/एप्रिल – २०२५**
**Shatriy Sangeetache Kriyatmak Siddhant (MA2220303)**

वार, दिनांक : शनिवार, १७-०५-२०२५ कमाल गुण: ८०
वेळ: सकाळी ११:०० ते ०२:००

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १६

१) राग–सूर मल्हार ची निर्मिती ––– थाटातून होते.
अ) कल्याण ब) बिलावल
क) काफी ड) तोड़ी

२) राग–चंद्रकंस चा गानसमय ––– मानला जातो.
अ) रात्रीचा प्रथम प्रहर ब) दिवसाचा दुसरा प्रहर
क) रात्रीचा दुसरा प्रहर ड) प्रातःकाल

३) राग–मधुवंतीची जाती ––– आहे.
अ) संपूर्ण–संपूर्ण ब) ओड़व–संपूर्ण
क) षाड़व–संपूर्ण ड) ओड़व–ओड़व

४) बिलावल थाटाचा जनक राग म्हणून खालीलपैकी ––– रागाला ओळखतात.
अ) अल्हैया–बिलावल ब) देवगिरी–बिलावल
क) देशी–बिलावल ड) राग–बिलावल

५) पावसाळी ऋतूमध्ये जास्त प्रमाणात गायला जाणारा खालीलपैकी ––– हा राग आहे.
अ) अहिर भैरव ब) मधुवंती
क) मियाँ मल्हार ड) चंद्रकंस

६) राग–मेघ मल्हाराचा वादी स्वर ––– व संवादी स्वर ––– मानला जातो.
अ) ध ग ब) म नी
क) प सा ड) म सा

७) राग–जयजयवंती हा ––– थाटातून निर्माण होतो.
   अ) खमाज   ब) बिलावल
   क) कल्याण   ड) पूर्वी

८) कर्नाटक संगीत पद्धती म्हणून प्रचलित असणारा खालीलपैकी ––– हा राग आहे.
   अ) मुलतानी   ब) देसकार
   क) हंसध्वनी   ड) जोग

९) राग–देवगिरी बिलावल चा थाट ––– मानला जातो.
   अ) कल्याण   ब) बिलावल
   क) खमाज   ड) भैरवी

१०) राग देसकार चा समप्रकृतिक राग ––– आहे.
   अ) राग–बागेश्री   ब) राग–भूप
   क) राग–भैरव   ड) राग–मालकौंस

११) राग–जोग चा समप्रकृतिक राग ––– आहे.
   अ) राग–तोड़ी   ब) राग–तिलंग
   क) राग–केदार   ड) यापैकी नाही

१२) राग–मुलतानी चा रेषभ आणि धैवत शुद्ध केल्यास खालीलपैकी ––– या रागाची निर्मिती होते.
   अ) मधुवंती   ब) तोड़ी
   क) बिलावल   ड) पटदीप

१३) ताल–पंचमसवारीच्या एकूण मात्रा ––– आहेत.
   अ) १२   ब) १४
   क) १६   ड) १५

१४) ताल–झपताल ची खाली ––– मात्रेवर येते.
   अ) ३   ब) ४
   क) ६   ड) ८

१५) ताल–तीनताल च्या एकूण मात्रा ––– आहेत.
   अ) १३   ब) १२
   क) १४   ड) यापैकी नाही

१६) ताल–अड़ाचौताल च्या मात्रा ––– आहेत.
   अ) १२   ब) १४
   क) १५   ड) १६

**प्र.२ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** १६

१) राग–सूर मल्हारचा शास्त्रीय परिचय लिहा.
२) राग हंसध्वनी चा छोटाख्याल स्वरलिपीबद्ध करा.
३) चतरंग या गीतप्रकारांवर टिपणी तयार करा.
४) राग–मियाँ मल्हार चा शास्त्रीय परिचय सांगा.
५) ताल–पाश्तो चा शास्त्रीय परिचय सांगा.
६) त्रिवट गीतप्रकार बद्दल माहिती लिहा.

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १६

१) राग–देवगिरी किंवा राग मुलतानीचा छोटाख्याल लिहा.
२) चतरंग चा गीतप्रकाराची सविस्तर माहिती लिहा.
३) राग–जयजयवंती चा संपूर्ण शास्त्रीय परिचय लिहा.
४) ताल–झपताल ची माहिती लिहून ठेका दुप्पट, तिप्पट लिहा.

**प्र.४ सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १६

१) त्रिवट आणि दादरा या दोन्हीं गीतप्रकारांची सविस्तर माहिती लिहून यावरील तुमचे विचार स्पष्ट करा.

**किंवा**

२) राग–देसकार चा शास्त्रीय परिचय देवून छोटाख्याल स्वरलिपीबद्ध करा व २ ताना व २ आलाप सह लिहा.

**प्र.५ सविस्तर उत्तर लिहा.** १६

राग–अल्हैया बिलावल किंवा राग मधुवंती चा बड़ाख्याल स्वरलिपीबद्ध करून त्याचबरोबर ४ आलाप व ४ ताना लिहा आणि यांच्या समप्रकृतिक रागांची माहिती लिहा. संपूर्ण शास्त्रीय परिचय लिहा.

| **Seat No.** | |
|---|---|

**Set P**

**एम्.ए. (Indian Music) (सत्र – III) (जुना) (CBCS) परीक्षाः मार्च/एप्रिल - २०२५**
**Essay Writing – II (MA20307)**

वार, दिनांक : सोमवार, १९-०५-२०२५ कमाल गुण: ८०
वेळ: सकाळी ११:०० ते ०२:००

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** **१६**

१) अनुवादाचा उपयोग संगीतात –––साठी होतो.
अ) सुषीर वाद्य ब) तंतूवाद्य
क) धन वाद्य ड) चर्मवाद्य

२) आवाजाची गोडी ––– वर अवलंबून असते.
अ) शक्ती ब) उंची
क) घनता ड) दिर्घता

३) 'आवाज साधना शास्त्र' या पुस्तकाचे लेखक ––– आहेत.
अ) अशोक रानडे ब) यशवंत देव
क) डॉ. बी. आर. देवधर ड) यापैकी नाही

४) संगीताच्या कार्यक्रमासाठी गुंजनकाळ ––– सेकंद असावा लागतो.
अ) ०.५ ते ०.६ सेकंद ब) १ सेकंद
क) १ ते १.५ सेकंद ड) १ ते १.२५ सेकंद

५) सम तापमानाला ध्वनीचा वेग प्रतिसेकंदाला ––– फूट असतो.
अ) १५०० ब) २१००
क) ११०० ड) २२००

